# अंजनरेषा

विलास कुलकर्णी



२९२६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय कथा
सं. क्र. २९२६
१९८३

REFBK-0018848
REFBK-0018848

# आंदण-रेषा

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९८८४८
(स्थळ प्रत)
REFBK-0018848
REFBK-0018848

विलास कुलकर्णी

प्रा. श्रीमती सुमेधा विलास कुलकर्णी,
एस्. एन्. डी. टी. महाविद्यालय,
( मराठी विभाग )
मुंबई वीस बी. आर.

●

प्रकाशन दिन :
सोळा डिसेंबर एकोणीसशे त्र्याहत्तर

●

प्रकाशिका :
सौ. कालिंदी कृष्ण अुजळंबकर,
सेहेचाळीस, वैदिकाश्रम, आपटे रोड,
डेक्कन जिमखाना, पुणे चार.

●

मूल्य : **सहा रुपये**

●

मुद्रक :
श्री. य. गो. जोशी,
आनंद मुद्रणालय,
पंधराशे तेवीस सदाशिव
पुणे तीस.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८१०६२
२१२८

ती.

आई आणि भाऊजींना

सादर—

— सुमेधा

'आंदण-रेषा' या कविता–संग्रहाच्या संदर्भात, काही गोष्टींचा उल्लेख करणे, मला आवश्यक वाटते.

या संग्रहाच्या संपादनाच्या कार्यात डॉ, अनुराधा पोतदार यांनी आपल्या या विद्यार्थ्यावरील अकृत्रिम आपुलकीने सहकार्य केले आणि प्रस्तावनाही लिहिली. तसेच माझे सहकारी प्रा. रा. वि. मंत्री आणि डॉ. सु. रा. चुनेकर यांनीही वेळोवेळी उपयुक्त सूचना केल्या.

डॉ. मोहन गुते, प्रा. राम डिंबळे, प्रा. अशोक निरफराके यांनी विलासच्या हस्ताक्षरातील कविता उपलब्ध करून दिल्या. प्रा. श्री. विलास जोशी, प्रा. श्री. विलास खोले, श्री. कमलाकर कुलकर्णी यांनी हा संग्रह प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिले; म्हणूनच हे कार्य तडीस जाऊ शकले.

बापू ( श्री. वसंतराव गीत ), आणि सर्व 'गीत' कुटुंबीय नेहमी-प्रमाणेच या धडपडीमागे उभे राहिले...

या सर्वांचेच ऋणानुबंध औपचारिक आभार मानण्याच्या पलीकडचे आहेत.

विलासच्या हस्ताक्षरात ज्या कविता उपलब्ध झाल्या त्यांमध्ये निवड करून प्रस्तुत संग्रह छापलेला आहे, कदाचित् विलासच्या छंदामुळे इतर कवींचीही एखादी कविता चुकून छापली जाण्याचा संभव नाकारता येत नाही. या संदर्भात शक्य तेवढी काळजी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु तसे कोणी निदर्शनाला आणून दिल्यास मी आभारी होईन.

या संग्रहाला साजेसे चित्र तत्परतेनं काढून दिल्याबद्दल श्री. हवालदार यांचे आणि या संग्रहाची छपाई अत्यंत सुबकतेने आणि काळजीपूर्वक केल्याबद्दल श्री. दादा जोशी यांचेही आभार मानायला हवेत.

**सुमेधा विलास कुलकर्णी**

विलासच्या कवितांचा हा संग्रह रसिकांपुढे ठेवताना अनेक संमिश्र भावनांची गर्दी मनात होत आहे. विलासच्या निधनाला येत्या सोळा डिसेंबरला एक वर्ष पूर्ण होईल. अकाली आणि आकस्मिक ही विशेषणंही निर्जीव वाटावीत, मन हतबुद्ध व्हावं अशा उमेदीच्या वयात ऐन पंचवीशीत त्याच्या जीवनाचं पुष्प खुडलं गेलं, सळसळत्या उत्साहाचं एक चैतन्य बघता-बघता मालवलं. एका तरुण मनानं जपलेली अनंत स्वप्नं, उमेदी आणि आकांक्षा जागच्या जागी थिजून गेल्या. प्रियजनांपाशी उरल्या त्याच्या आठवणी आणि त्याच्या कविता.

त्याच्या कवितांचा हा संग्रह, त्याच्या प्रथम स्मृतिदिनीच रसिकांपुढे ठेवण्याच्या निश्चयानं, त्याची पत्नी सुमेधा हिनं ठिकठिकाणी विखुरलेल्या त्याच्या कविता परिश्रमपूर्वक एकत्रित करण्यापासून सारं काही केलं.... मनातील दुःखावेगाला संयमानं, विवेकानं आवर घालीत केलं, तिच्याच उत्कट भावनेनं आणि परिश्रमानं आज हा संग्रह आणि विलासची स्मृतीही रसिकांपुढं येत आहे.

विलासला आणि त्याच्या कवितेलाही अनेक वर्ष जाणणारी एक वडिलधारी व्यक्ती एवढ्याच नात्यानं, त्याच्या या कविता-दुहितेला रसिकांपुढे जाताना, हा प्रेमाचा निरोप मी देत आहे.

विलास माझा विद्यार्थी होता. प्रथम स. प. महाविद्यालयात आणि नंतर एम्. ए. च्या निमित्तानं पुणे विद्यापीठातही. या विद्यार्थीदशेची उणीपुरी सहा वर्षे आमचं जिव्हाळ्याचं साहचर्य होतं. बी. ए. च्या अखेरच्या वर्षी तो माझ्या तासांना, वर्गात नेहमी बसत असे; ती जागाही अजून माझ्या डोळ्यांपुढे आहे. प्राध्यापकांची वाणी सुरू झाली की परजलेली लेखणी सरसावीत खालमानेनं शब्दन् शब्द लिहून घेणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा तो निराळा होता. तो लिहीत असे कमी, पण त्याचं अवधान मात्र सहसा विचलित झालेलं पाहिलं नाही. त्याचं ऐकणं फार सजग आणि पाहणं विलक्षण बोलकं होतं. ऐकता-ऐकता काही विशेष जाणवलं किंवा पटलं की त्याच्या मानेची अभावितपणं होणारी हालचालही अजून मला आठवते. संगीताच्या मैफलीत उस्फूर्तपणं दाद द्यावी तशी तो साहित्याच्या आस्वादाला आणि समीक्षेला देत असे. चष्म्याआडून पाहणाऱ्या त्याच्या तरुण लुकलुकत्या

‘ आंदण-रेषा ’ या कविता–संग्रहाच्या संदर्भात, काही गोष्टींचा उल्लेख करणे, मला आवश्यक वाटते.

या संग्रहाच्या संपादनाच्या कार्यात डॉ. अनुराधा पोतदार यांनी आपल्या या विद्यार्थ्यावरील अकृत्रिम आपुलकीने सहकार्य केले आणि प्रस्तावनाही लिहिली. तसेच माझे सहकारी प्रा. रा. वि. मंत्री आणि डॉ. सु. रा. चुनेकर यांनीही वेळोवेळी उपयुक्त सूचना केल्या.

डॉ. मोहन गुते, प्रा. राम डिंबळे, प्रा. अशोक निरफराके यांनी विलासच्या हस्ताक्षरातील कविता उपलब्ध करून दिल्या. प्रा. श्री. विलास जोशी, प्रा. श्री. विलास खोले, श्री. कमलाकर कुलकर्णी यांनी हा संग्रह प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिले; म्हणूनच हे कार्य तडीस जाऊ शकले.

बापू ( श्री. वसंतराव गीत ), आणि सर्व ‘ गीत ’ कुटुंबीय नेहमी-प्रमाणेच या धडपडीमागे उभे राहिले...

या सर्वांचेच ऋणानुबंध औपचारिक आभार मानण्याच्या पलीकडचे आहेत.

विलासच्या हस्ताक्षरात ज्या कविता उपलब्ध झाल्या त्यांमध्ये निवड करून प्रस्तुत संग्रह छापलेला आहे, कदाचित् विलासच्या छंदामुळे इतर कवींचीही एखादी कविता चुकून छापली जाण्याचा संभव नाकारता येत नाही. या संदर्भात शक्य तेवढी काळजी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु तसे कोणी निदर्शनाला आणून दिल्यास मी आभारी होईन.

या संग्रहाला साजेसे चित्र तत्परतेनं काढून दिल्याबद्दल श्री. हवालदार यांचे आणि या संग्रहाची छपाई अत्यंत सुबकतेने आणि काळजीपूर्वक केल्याबद्दल श्री. दादा जोशी यांचेही आभार मानायला हवेत.

**सुमेधा विलास कुलकर्णी**

विलासच्या कवितांचा हा संग्रह रसिकांपुढे ठेवताना अनेक संमिश्र भावनांची गर्दी मनात होत आहे. विलासच्या निधनाला येत्या सोळा डिसेंबरला एक वर्ष पूर्ण होईल. अकाली आणि आकस्मिक ही विशेषणंही निर्जीव वाटावीत, मन हतबुद्ध व्हावं अशा उमेदीच्या वयात ऐन पंचवीशीत त्याच्या जीवनाचं पुष्प खुडलं गेलं, सळसळत्या उत्साहाचं एक चैतन्य बघता-बघता मालवलं. एका तरुण मनानं जपलेली अनंत स्वप्नं, उमेदी आणि आकांक्षा जागच्या जागी थिजून गेल्या. प्रियजनांपाशी उरल्या त्याच्या आठवणी आणि त्याच्या कविता.

त्याच्या कवितांचा हा संग्रह, त्याच्या प्रथम स्मृतिदिनीच रसिकांपुढे ठेवण्याच्या निश्चयानं, त्याची पत्नी सुमेधा हिनं ठिकठिकाणी विखुरलेल्या त्याच्या कविता परिश्रमपूर्वक एकत्रित करण्यापासून सारं काही केलं.... मनातील दुःखावेगाला संयमानं, विवेकानं आवर घालीत केलं, तिच्याच उत्कट भावनेनं आणि परिश्रमानं आज हा संग्रह आणि विलासची स्मृतीही रसिकांपुढं येत आहे.

विलासला आणि त्याच्या कवितेलाही अनेक वर्षं जाणणारी एक वडिलधारी व्यक्ती एवढ्याच नात्यानं, त्याच्या या कविता-दुहितेला रसिकांपुढे जाताना, हा प्रेमाचा निरोप मी देत आहे.

विलास माझा विद्यार्थी होता. प्रथम स. प. महाविद्यालयात आणि नंतर एम्. ए. च्या निमित्तानं पुणे विद्यापीठातही. या विद्यार्थीदशेची उणीपुरी सहा वर्षे आमचं जिव्हाळ्याचं साहचर्य होतं. बी. ए. च्या अखेरच्या वर्षी तो माझ्या तासांना, वर्गात नेहमी बसत असे; ती जागाही अजून माझ्या डोळ्यांपुढे आहे. प्राध्यापकांची वाणी सुरू झाली की परजलेली लेखणी सरसावीत खालमानेनं शब्दन् शब्द लिहून घेणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा तो निराळा होता. तो लिहीत असे कमी, पण त्याचं अवधान मात्र सहसा विचलित झालेलं पाहिलं नाही. त्याचं ऐकणं फार सजग आणि पाहणं विलक्षण बोलकं होतं. ऐकता-ऐकता काही विशेष जाणवलं किंवा पटलं की त्याच्या मानेची अभावितपणं होणारी हालचालही अजून मला आठवते. संगीताच्या मैफलीत उस्फूर्तपणं दाद द्यावी तशी तो साहित्याच्या आस्वादाला आणि समीक्षेला देत असे. चष्म्याआडून पाहणाऱ्या त्याच्या तरुण लुकलुकत्या

डोळ्यात, त्याच्या वृत्तीमधली सारी उत्कटता आणि अधीरता भरून राहिलेली दिसे. प्रथम हासत ते त्याचे डोळे. बघता–बघता ते हास्याचं चांदणं त्याच्या सावळ्या चेहऱ्यावर पसरे आणि तो उजळून जाई. मूळच्याच उत्साही, तरळ वृत्तीमुळे अनेक गोष्टींबद्दलच्या त्याच्या प्रतिक्रिया अतिशय उत्स्फूर्त आणि अनावर असत. वर्गात काही ऐकता–ऐकताच न राहवून, गडबडीनं उभं राहून, घाईगर्दीनं बोलू पाहणारी त्याची मूर्ती आज माझ्या डोळ्यासमोर आहे. उत्कटता, उत्साह हा त्याच्या वृत्तीचा स्थायीभाव होता आणि त्याची रसिकताही जागरूक होती. स्वतः अध्यापनाला आरंभ केल्यावर याच बळावर आपल्या विद्यार्थ्यांची मनंही यानं तात्काळ जिंकली होती. वाङ्मय–मंडळाचा कार्यक्रम असो, कॉलेजची सहल असो किंवा स्वतःच्या लग्नातला उखाण्यांचा कार्यक्रम असो--त्याच्या उत्साहाला नेहमीच भरतं येत असे. आज हे सारं आठवतांना मनात येतं, स्वतःचा पहिला–वहिला कविता–संग्रह निघत असताना विलास असता तर......त्याच्या उत्साहास किती उधाण आलं असतं....

त्याचा हा पहिला संग्रहच अखेरचा ठरावा, या दुर्दैवी योगाचा विषाद, आजही मला तीव्रपणे वाटत आहे.

विलासच्या उण्यापुऱ्या शंभराहून अधिक कविता गेले काही दिवस सलगपणं वाचताना अनेक संमिश्र भावना मनात तरळत होत्या. त्याच्या मृत्यूची काळवंडलेली छाया मनावर आणि या कवितांवरही पडली असली तरी त्यातूनही एक ताजं, उत्कट कविमन सतत उत्फुल्लपणं जाणवत गेलं – त्याच्या मरणालाही मागं टाकत गेलं. असंही वाटलं की अनेक वर्षं जवळून पाहूनही, त्याच्या व्यक्तिमत्त्वाची सारीच अंगं आपल्याला कळलीच नव्हती — ती त्याच्या कवितातून उमटली आहेत. ... त्याच्या शब्दाशब्दातून जाणवत आहेत. सतत जाणवत गेलं की हे मन सदैव जीवनाला सन्मुख होणारं आहे. अनुभवांना सामोरं जातानाही ते अर्ध्यामुर्ध्या मनानं जाणारं नाही. व्यक्त करतानाही सहसा हातचं राखून व्यक्त करणारंही नाही. स्वतःच्या व सभोवतीच्या जीवनात डोळस, उत्कट आणि जोरकस मनानं जगणाऱ्या व्यक्तीची अनेकविध स्वरूपाची अनुभूती या कवितांतून साठवली आहे. आपल्या अनुभूतीचं पूर्ण रूप त्या मनालाही नेहमीच

आकळलं होतं असं नाही – किंवा त्या अनुभूतीचा कस अभिव्यक्तीत नेहमीच पूर्णत्वानं उतरू शकला नाही. काव्यात्म भावाशयाला त्याच्या सर्व सुप्त धगीसकट, ताणासकट अलगद उचलून धरणाऱ्या शब्दांची, प्रतिमा–प्रतिकांची संगतही या कवितेला नेहमीच मिळाली; असेही नाही. तरीही अनेक कवितांतून ही अनुभूती मूळच्याच जिवंत, सळसळत्या रूपात जाणवते यात शंका नाही. ही अनुभूती घेणारं मनही तारुण्याच्या जिद्दीनं व जोमानं भरलेलं असल्यानं; आशय – अभिव्यक्तीचं हे रसायन जेव्हा जमून येतं; तेव्हा ते मोठं अर्थपूर्ण व प्रभावी होतं; खऱ्याखुऱ्या अर्थानं काव्यात्म होतं.

तारुण्याच्या नव्हाळीत सळसळत्या रक्ताच्या लयीत साकार झालेल्या या कवितांमध्ये प्रेमानुभवाच्या अनेक कोवळ्या, भावुक, तशाच तीक्ष्ण आणि पक्व छटाही सहजपणं उतरल्या आहेत आणि सांकेतिकतेच्या कोंदट वातावरणात त्या सुदैवानं गुदमरलेल्याही नाहीत. या संग्रहातली मला विशेष आवडलेली त्याची तिसरीच कविता पहा—

" झपाटल्यागत आपण
 ... झोंबी खेळलो होतो
स्वतःच्याच अस्तित्वाचा
 बुंधा हलवून
दुनियेला केलेते दावेदार
 अन् भाळावर
घेतली स्वतःची राख माळून— "

ही एक प्रेमकविता आहे. पण केवळ नाजुक व गोंडस शब्दांच्या भुलावणीत अडकण्याइतकी तिची अनुभूती तारुण्यसुलभ असूनही वरपांगी किंवा तकलुपी नाही. तिची धार आणि झेप नवथर मनाऐवजी तावून–सुलाखून निघालेल्या पक्व, सुजाण मनाला शोभणारी आहे. रसायनाच्या एका थेंबाची धग व तीव्रता तिच्यात भरून राहिली आहे. कधी हीच तीव्र अनुभूती संयत आणि प्रौढ समजावणीच्या किंवा स्वीकारशीलतेच्या रूपातही अनपेक्षितपणे जाणवते आणि अननुभवी तारुण्याशी विसंगत वाटणाऱ्या अनेक भावच्छटांनी मनाला सुखद धक्काही देते—

" पावला – पावलांची घालमेल
त्यातूनच शोधायचा आहे आपला जीवनमार्ग...
अनेकजण या वाटेनंच गेलेत...

आणि याच कवितेचा हा विलक्षण अर्थपूर्ण शेवट पहा—

" खर सांगू ?
दोघं जाण्याच्या कल्पनेत जेव्हढा मझा असतो ना
तेवढा प्रत्यक्ष दोघांनी जाण्यातही नसतो...."

नवथर तारुण्याला अनोखे असणारे एक विदारक सत्य या शब्दातून कसे नकळता व्यक्त झाले आहे. अनुभवाच्या पृष्ठभागावर वावरणारी, कधी कधी शब्दांच्या खेळात आणि मोहात सापडणारी हीच कविता मध्येच आपल्या मिताक्षरी; उत्कट स्वरूपातच किती सघन होते, जुन्या अनुभवालाच कसे नवे, भावगर्भ रूप देते पहा—

" क्षणामध्येच पूर्वरचित आयुष्याचा घोट पिऊन
त्या नशील्या डोळ्यात
रात्रीचे दिवे पेटवत
चुटपुटल्या स्पर्शांनी तू सुचवलेस....

कधी कधी या प्रेमानुभवाचीच रूपकळा अशी हळुवार व कोमल स्वरूपात भावते की शब्दांनाही जवळ जाण्याचे भय वाटावे.

" तुझी नजर वाऱ्हेली
माझ्यावरी पडताच
फुले फुटती रक्ताची
बोलतील तुझ्याशीच
उगा अनोखा यायचा
तुझ्या दुःखाला आकार
अश्रूंचा; मी, पुसावाच;
आणि वेडा हा निर्धार...."

या कवितांमधून व्यक्त होणारा प्रेमानुभव असा जोरकस व जिवंत आहे.

" कुणी मला विचारिता, तुझिया प्राणाते
—प्रीतिस्पर्श झाला याला, प्रमाण कोणते ? "

हे त्यानेच दिलेले काव्यमय उत्तरही येथे आठवल्यावाचून राहत नाही.

प्रेमानुभवाप्रमाणेच सभोवतीच्या जीवन–कलहानं बंड करून उठणाऱ्या मनाचे संमिश्र पडसादही या कवितेतून साहजिकच उमटले आहेत आणि कधी कधी चिंतन–शीलतेच्या भावगंभीर वाटेनंही ती गेली आहे. " जगणे किती स्वस्त होत चालले आहे–" ही सारीच कविता पहा किंवा,

> " वाहनात बसून टेकडी चढणे जमूही शकले असते—
> भूमीवरच्या हिरव्या पानाशी मग कोण बोलले असते ? "

या कवितेवर नारायण सुर्वे यांची दाट छाया असली तरीही तिच्यातील भावनेचा, विशेषतः शेवटच्या ओळीतील भावगर्भ प्रश्नाचा सच्चेपणाही जाणवल्यावाचून राहत नाही.

> " अस्मानफेक जातीच्या अश्वमेधीय अश्वाला,
> बुद्धिबळात आपण अडीच घरंच जायचं असतं
> हे कळत नाही...."

अशा अर्थपूर्ण शब्दातून कविमनाचं चिंतनही साकारलेलं दिसतं. या चिंतनात उपहास, बंडखोरी, समज आणि स्वीकारशीलता अशा अनेकविध भावच्छटांचे रंग मिसळले आहेत.

ही कविता तिच्या वाटेवर पहिली चाचपडती पावलं टाकत होती. काळानंच तिची पावलं अकाली, फार अकाली थांबवली. या कवितेला तिची स्वतःची प्रकृती, तिचं स्वत्व, तिची शब्दकळा–सारेच अजून पुरतेपणाने सापडायचे होते....शोध चालू होता, तरंग उमटत होते, चाहूल लागत होती.—-प्रचीतीच्या खुणाही हळुहळू दिसू लागल्या होत्या...पण कळीचं फूल व्हावं तसा या साऱ्याचा सहज विकास व्हायला काळानेच अवसर न दिल्यानं, काही प्रथितयशांच्या खुणा व अनुकरणाच्या छटा या संग्रहात अधून–मधून विखुरलेल्या दिसतात, यात आश्चर्य नाही. विलासच्या मूळच्याच उत्साही व बंडखोर वृत्तीला नारायण सुर्व्यांची कविता, तिच्या शब्दकळेसकट जवळची वाटली. " मरणाच्या अगोदर झाले आम्हीही कितीकदा मेलो–" किंवा " आमच्या बापानं काय परवानगी विचारली होती–" या ओळी वानगीदाखल पहा.

मंगेश पाडगावकरांच्या कवितेचाही 'विदूषक' या संग्रहापासून पालटलेला मोहरा अनेक उदयोन्मुख कवींप्रमाणेच विलासलाही जवळचा वाटला असावा. म्हणूनच जीवनावर चढलेली उपरी, खोटी आवरणे जणू टराटरा फाडून, ओरबाडून काढण्याच्या वृत्तीची परखड चाहूलही या संग्रहातून जाणवते.

परंतु पुन्हापुन्हा जाणवते ते हेच की हे उसने सूर हळूहळू लोपले असते. हे वरवरचे मुखवटेही हलके हलके गळून पडले असते. कवि-मनालाच अधिक पक्वता, जाण आली असती ... स्वतःचीच ओळख अधिक पूर्णत्वानं पटली असती. त्यातूनच स्वतःच्या कवितेचीही ... हीच कविता अधिक पूर्णत्वानं आपली होऊन आली असती – स्थिरावतानाच विकसितही झाली असती. आजही, अनुभवांना जिवंतपणे सामोऱ्या जाणाऱ्या, आपल्या कवेत घेणाऱ्या, सच्च्या कवित्वाच्या खुणा या पहिल्या व अखेरच्या संग्रहातही जागजागी दिसतात.

या कविता वाचताना मन विव्हल आणि स्तिमित होतं ते दुसऱ्याच एका जाणिवेनं ! ऐन तारुण्यात शब्दबद्ध झालेल्या यातील अनेक कवितां-वर मृत्यूची अनाहूत छाया पडलेली स्पष्टपणे जाणवते. बालकवींप्रमाणेच जगण्याचे सत्य अनुभवीत असतानाच या कविमनानं मृत्यूचं स्वप्नही जागेपणी सतत पाहिलं असावं; याची साक्ष देणाऱ्या याओळी पहा—

" फारच झाले वादळ आणि फुटलीच होडी तर म्हणावे
आता दोन्ही दिशा तुझ्याच आहेत " किंवा

" खूप योजलं होतं
होडी वल्हवीत दूर जायचं
अशी माळून मृत्युफुलं
अस्मानाला भिडायचं होतं— "

या ओळी वाचताना अटळ – अदृष्टाचं दर्शन या तरुण मनाला झालं होतं काय, या आशंकेनं मन भारावून जातं. जे होऊ शकलं असतं, पण निय-तीच्या आघातानं जे कायमचं हरपलं, त्याच्या जाणिवेनं ते विषण्णही होतं.

४–१२–७३ **अनुराधा पोतदार**

.१.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ..........
संग्रह शाखा

सौ. बेबू,

स. न. वि. वि.

मरणावाट मसणवटीतून नेहणारी
कुसांच्या कण्हण्यातच गुदमरणारी आसवांची धुमाळी,
जाळेच्या धुरात कोंदणारे आठवणींचे उसासे,
जातांना, गेलोच जर चार खांद्यावरून
वाटते आडवे येईल सावित्रीचे मंगळसूत्र
आणि उन्हपावसात न्हाणारे तुझे
सौभाग्य कुंकू ---

विलास कुलकर्णी

.२.

सर्व देऊन टाकण्याचेच आंदण घेतले होतेस तू—
सर्व ' स्वा ' लाच ' स्वा ' हा करून !
पण साऱ्या अस्तित्वसीमेलाच छेदणारी आंदणरेषा मात्र
लक्ष्मणरेषा केलीस तू !
सर्व देण्याचेच उरल्यानंतर मात्र
हबकलो होतो मी...
शमलो तेव्हा,
तुझ्या आंदणाचा वसा घेऊन उरलो !

.३.

झपाटल्यागत आपण
    झोंबी खेळलो होतो
स्वतःच्याच अस्तित्वाचा
    बुंधा हलवून
दुनियेला केलेते दावेदार
    अन् भाळावर
घेतली स्वतःची राख माळून

दोन मिनिटांतच
    गडप झालोतो
पण तेवढ्यातच
    दिलेतेस आलिंगन
विश्व कोसळताना
    तेवढाच आधार होता— !

.४.

माझ्या प्रत्येक क्षणाच्या नवलाईनं
तू बिचकतेस.—
माझी अस्थिरता, तुला अस्वस्थ करते.—
तेव्हा तू खूप भाबडी वाटतेस...
एक सांगतो.—
कुणी काळजी करण्याइतका मी मोठा नाही
कुणी लाथ मारण्याइतका मी क्षुद्र नाही
मला एकच माहिती आहे—
( तुला ते सांगायला हवंच का ?....)
मरणाची संगत ज्याला जन्मापासून असते;
तोच जीवनाचा खेळ जिद्दीनं रंगवतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८१०८२ दि: ५।१०।१
... २१२९ ... ११।१

.५.

अस्मानफेक जातीच्या अश्वमेधीय अश्वाला,
बुद्धिबळात आपण अडीच घरंच जायचं असतं
हे कळत नाही...

उंच तरारणाऱ्या देवबिंदूला,
सूर्यकिरणातच आपण विरघळणार आहोत
हे कळत नाही......

आणि गरजणारे चाळीस, स्वातीच्या एका
थेंबाच्या योग्यतेचे नसतात,
हे त्यांनाही कळायला उशीर लागतो...
तेव्हा अंधार होताच दिवेलागण गात असते...
'एकश्चन्द्रस्तमो हन्ति '......

.६.

जळणे ज्ञात असते तसे घडणेही
कळणे ज्ञात असते तसे मळणेही
एक वाटत राहते—
जळण्याचे जीवन लाभलेला उजळू शकतो का ?
आणि
घडण्याला तत्पर असलेला, उघडू शकतो का ?
एक माहिती आहे—
ज्याला कळत राहते, तोच उकळतो
आणि
मळण्याची संगत धरलेलाच उमलतो
एक प्रश्न आहे....
जो लगडतो....जो लगडतो
त्याने,
निदान त्याने तरी,
उलगडावे...

७.

समुद्र उहुळला तेव्हाची आग पचवलीस
आता शीतल लाटांचं प्रमत्त नर्तन ऐक...
आकाशानेच धरित्रीचे सूर्यचक्र गिळलेते
अन् पंचमहाभूतातच विरलेते सामर्थ्य
युगंधरानं मावळतीचा होता अस्त धरलेला
आणि शुक्राचार्यही होता झारीत अडकलेला
खडक भेदून बहरलेले बीजाचे उड्डाण पाहिलेस
त्या वटवृक्षाला डसलेला शिशिरही आता पहा...
क्षितिज कवळून धरलेते पापण्यात
आणि ओठात स्वरांना ओवलेते
पायात साकळलेली गती
आणि हातात धरलेली शक्ती
अश्रूंना पुसत आणि सामर्थ्य गोठवत
स्वतःमध्येच विश्व उभारते...
त्या विश्वसर्जनाची वेदना
आणि स्फूर्तिदात्री वासना आता स्मर...
तुला माहितीय...
सगळ्याच व्यक्ती प्रश्नचिन्हे असतात
तसा एखादाच उद्गारचिन्हात उभारतो...
सगळ्याच व्यक्ती व्यंजनेत निसटतात
तसा एखादाच अक्षर उमटवतो--



[३]

.८.

( सात पावलात धपापली होतीस...! )
पावला–पावलांची घालमेल
त्यातूनच शोधायचा आहे आपला जीवनमार्ग...

अनेकजण या वाटेनंच गेलेत......
' आपली ही वेगळी वाट ' असं म्हणतच !
खरं म्हटलं तर मळलेली वाट बरी असते
धडपडलो तरी फारसं लागत नाही
लागलं तरी ओरडता येतं
ओरडलं तरी ऐकू जातं...

पावला–पावलांची घालमेल
त्यातूनच शोधायचा आहे आपला जीवनमार्ग...

या ' गन्तव्याला ' अर्थ नाही
तरी चालायचं...
' जपून हं ' म्हणता म्हणताच
भरभर....
' दोघं मिळून ' म्हणता म्हणता
एकेकट्यानं...
या वाटेचं हेही एक वेगळेपण !
काही उलटी पावलं दिसतात
काही पांढऱ्या पायाची

पण तिकडे बघण्यात अर्थ नाही
कारण या मार्गानं जाताच,
नजर तेवढी निबर होतेच...
कुठे फरफटल्याच्या खुणाही भेटतात
कुठे जडत्वाच्या
कुठे एक दुसऱ्या पावलातच विरलेलं
कुठे एक दुसऱ्यापेक्षा भलंमोठं
पण चिकित्सा का करतेस ?
ही तर सोय आहे
एकदा सांगितलं ना

पावला–पावलांची घालमेल
त्यातूनच शोधायचा आहे आपला जीवनमार्ग...

तुला ऐकू येते का
ती समर्पण–मीलनाची चिवचिव ?
हुंदक्यात, किंकाळ्यात
ती कदाचित विरली असेल;
म्हणून विचारलं...
खरं सांगू ?

दोघं जाण्याच्या कल्पनेत जेव्हढा मझा असतो ना
तेवढा प्रत्यक्ष दोघांनी जाण्यातही नसतो...

९..

खूप योजलं होतं
प्राणवायूचा साठा करून
ऊब देणाऱ्या भावना भरून
अस्मानाला भिडायचं म्हणून !

होडी वल्हवत दूर जायचं
अशी माळून मृत्युफुलं
क्षितिजाला भिडायचं होतं......

अस्मान जाऊ दे
आणि जाऊ दे
किनाऱ्याचा सोस--
बर्फात गाडलो ही ना
ना पाण्यात बुडालो

हे असं अधांतरीच
त्रिशंकुवत्...
किंवा निखळणे कसे साहू ?

सौंदर्यानं निथळणाऱ्या ललित शृंगारातील चैतन्य आता
गारठून गेले आहे.
आणि पश्चिम क्षितिजावर कुमुदिनीच्या प्रियकराने कशी
मान टाकली आहे—
गर्द पानांच्या मिठीतली ऊब वितळत जाऊन कुजबूज करते ना
त्या वेळेस खरं म्हणजे चैतन्याच्या चंद्रम्याने दवाला स्पर्श
करायचा असतो

अनेक दिसांचे स्वप्न जेव्हा नयनातच साकळून जाते—
आणि लक्षावधी वाटा जेव्हा दृष्टीमध्येच विलीन होतात—
घनदाट अंधकाराने जेव्हा डोळ्याला डोळा भिडवलेला असतो,
तेव्हा खरे म्हणजे पापण्यांनी आतमध्ये पहायला शिकवायचे—
तिथे दिसतील अनंत वाटा……
क्षितिजे नसलेल्या

बोधिवृक्षाच्या सावलीत जेव्हा
अबोध मनाला उषा जागवते ना
आणि दूर कन्याकुमारीवर
एखाद्या विवेकाला आनंद होतो ना
त्या क्षणांनी, फक्त एकदाच
बहरायचे असते—
एकदाच मरायचे असते
……आपल्याच जीवावर !

.११.

नवे रंग. नवे अंग. नव्या लाटा. नव्या वाटा.
नवे सारे चोखाळले, स्मृती सले उरी काटा.
सारी नव्याची नव्हाळी, नवी धुंदी नवी हवा.
सारे जरी नवे मात्र, जुन्याचाही सोस नवा.
उपटले सारे जरी, नव्या खुणी उमटते...
विसरले सारे जरी, नव्या मार्गी आठवते.
नव्या जुन्याचा ' काळिमा ' हृदयाला खुपे खंत
तोच मीच, नशा तीच, चालण्याला नाही अंत...
सारे जुने खुणावते, नव्याचीही नशा न्यारी
जुने कुठे धरताना, अडकतो नव्या दारी.

.१२.

मी तुला आताच काही एक सांगणार नाहीय—
आत्ताच !
कारण संपूर्ण कोसळल्यावर
मला तुझा खांदा हवाय...
माझी जखम बांधायला
आतासुद्धा तू तयार असशील
तरीदेखील;
अर्ध्या-रात्री उपाशी होऊन आल्यावर
तुझं 'पान' मला हवंय–
एव्हाना तू माझ्या मनातलं ओळखलं असशीलही...
'शब्द ही भावनेची स्मारके असतात'
हे कळतंय त्याला मी काय करू ?
शेकडो मैल दूर गेलो
चालण्याचे विसरून गेलो...
पुढचे काही माहीत नसले तरी;
मागल्या मुक्कामाची याद आहे...
एक तरी तू मान्य करायला हवेस,

‘ स्नेह क्षमाशील असतो ’
—( असलाच तर-! )
आणि पहिल्याच गुन्ह्यानं
—( असलाच तर—! )
त्यानं आटू नये....
पूर्ण कोणीच नसतो;
तरी प्रत्येकाला त्याची जाणीव नसते...
आणि प्रत्येक अनुभव ‘ युनिक् ’ असल्यानं,
वेगळा विचार मागत असतो
मला माहितीय;
पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण मोठं असतं
पण म्हणून ऊर्ध्वगामी प्रेरणांचं अस्तित्व
अमान्य का करायचं ?
अशावेळी माणसाच्या त्रिज्या जाणवतात
त्याचा बदल त्याला शिकवतो...
तुला हे सांगायला नको...
कारण मायेला
ओलावाही आणि ऊबही असते
हे तुला माहितीय...

.१३.

तुझ्या सावल्यांना होता
    साऱ्या मातीचा आसरा
माझ्या डोळ्यांपुढे मात्र
    होता सूर्याचा निखारा
तेजाळणे नुरे आता
    सारे काही विझवणे
राखेतही त्याच सत्या
    एक निवारा शोधणे.

.१४.

क्षणामध्येच पूर्वरचित आयुष्याचा घोट पिऊन
त्या नशील्या डोळ्यात
रात्रीचे दिवे पेटवत
चुटपुटत्या स्पर्शांनी तू सुचवलेस...
' तू माझा आहेस.... '

बस्स्...एवढेच...
आणि ' मी तुझा झालो ! '

.१५.

तुझ्या मत्त उरोजांशी
सलगी वाढताना
दोन हात झाकोळती
प्रेमपूर पाहताना
दूरदूरचा तो श्वास
धसमुळे दिरंगाई
धुंदवेड्या आसक्तीने
का ग गावी अंगाई ?

.१६.

क्षितिज हिंदकळेतो हिंडलो आपण
दिशांना रिचवत रिचवत...
निसटते आकाश धरले होते, रंगही होते उधळले.
हृदयातली ' राणीव ' होतो कुजबुजलो—
शिरलोतो फुलांच्या पोकळीत....

एक मात्र अजूनही समजत नाही—
मध्येच अचानक तू माझे बोट का सोडले होतेस ?

.१७.

देठानेच घेतला होता कळीचा आकार
आणि कळीने तोलले होते विशाल गगन
माझ्या असंख्य अपेक्षांच्या गोवर्धनाला
हवी आहे; तुझ्या करंगळीची साथ.
स्पर्श उडून गेला तरी धरून ठेवलेली आसक्ती
गंध विरघळला तरी दवात न्याहाळते तुझे रूप
दवाने का होईना, कधी भिजवशील का रे नयन ?
आणि तोलशील ना रे, अपेक्षांचे गंधवेडे आकाश !

.१८.

उलगडता बावरले
 ‘ मी ’ चे अस्तित्व नवे
चुकलेल्या नचिकेता
 मृत्यूचे दार हवे

झगमगती दुनिया ही
 मायेची स्नेहवात
नटलेल्या नटराजा
 नांदीचे सूर सात.

.१९.

अनेक उन्हं साकळत ओठंगली माती...
अनेक रात्री जागवत उसवली नाती
अनेक वाटा शोधल्या अनेक ओलांडल्या
अनेक केल्या गमजा झालो दरवेशी

अनेकदा अनेकांचा झालो असतो
एकटीचा नाद काही विसरलो नाही
अनेकांच्या मेळाव्यात गजबजलो होतो
तुझे माझे अंतर मात्र उमजले नाही.

.२०.

कुणी मला विचारिता, तुझिया प्राणाते
प्रीतिस्पर्श झाला याला, प्रमाण कोणते ?
उत्तरेन मीहि, ' नाही प्रत्यक्ष प्रमाण ',
...मात्र आला गीतालागी बहर नवीन !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

.२१.

तुझ्या दोन हातात सामावलेले सारे आभाळ
आणि दृष्टीत पकडलेले क्षितिजाचे अंगण
दिसभरल्या उजेडाचा अंगारा उधळून येते संध्याकाळ
आणि क्षितिजाला सामावून घेते रात्रीचे तारांगण.

.२२.

तोंडावर बुरखे घेऊन वावरणे फारसे अवघड नसते;
तसे करून आम्हालाही मोठे होता आले असते—
वाहनात बसून टेकडी चढणे जमूही शकले असते ...
भूमीवरच्या हिरव्या पानाशी मग कोण बोलले असते—

.२३.

उजाड झाले तरीही, वरती आकाश होते—
कोसळताना दहा दिशांचे आधार होते.
तृषातृप्तीला दूर दिसले मृगजळ होते
भग्न देखते अश्रू जरासे पुसले होते—

.२४.

सरतेशेवटी तुझी वाट क्षितीजच झाली—
तुझी दृष्टी, तुझी सृष्टी नभा साकळली
तुझे कान नाद झाले, गती तुझे पाय झाले
गंधच झाले संवेदन, आसक्तीचे स्पर्श झाले—
एक मात्र राहून गेले, तुझी सावली दूर झाली
दूर दूर एकदाची माझ्या छायेत मिळून गेली.

.२५.

अर्थहीन शब्दांची याचना
आणि शब्दहीन ‘ ध्वनी ’चे आव्हान...
माझ्या अनेक कल्पनांना—
हवे आहेत शब्दफुलांचे पंख
आणि अर्थांच्या रुणझुणत्या पैंजणांनीच
खेळायचे आहे ते ‘ कालहारी ’ तांडव !

.२६.

सागराला छेदणारी क्षितिजरेषा
विव्हळत सांगू बघते की पलिकडे अंधार आहे...
तेव्हा एकच कळते—
अंधाराला दिवस गेलेत !

.२७.

कोसळलो असतो तरिही
पापणी प्रसवली नसती
बेफाट उधळता वारा
प्रस्थान उठवले नसते.

.२८.

नको आता बोलावूस
तुझा माझा मार्ग भिन्न
तुझे तुझे माझे माझे
मन एक देह भिन्न.

.२९.

विसरायाचे असेल काही....
विसर गडे हा खुळा अबोला
विसरशील नेमका नाही तर
विसरायाचा निश्चय अपुला !

.३०.

सहा एक्कावन्ची बस चुकली;
गणित चुकले, गाडी चुकली.
सारे निघून गेले, नेहमीचे
नवे आले...नेहमीचेच...

" थोडा डबा लौकर मिळायला हवा...
भाकरी करपली–कच्ची खाल्ली असती...
थोडा लवकर झोपलो असतो तर "...
सहा एक्कावन् पकडली...असती...

आता वाट पाहणे उरले आहे.
पंख भिजले आहेत...
अश्रू थिजले आहेत...
सहा एक्कावन्...तू केव्हा येणार ?...
' कब आयेगी तू...... '

.३१.

ज्वालांची फुले माळून
अंगार तुषारांत न्हात
शारदीय वेल सळसळते...
मधुरमेची स्निग्धता गोठत
हिमनगातील ऊब
नवकोंभात साकळते...
तुझ्या बेबंद नखऱ्यातील
सावरता तोल
आणि बुलंद नजरेतील गहिरे लाघव
अश्रूंत विरघळते...
अमृताच्या अनुभवात
की अनुभवाच्या अमृतात
मृतांचे भावणे आणि अनुजांचे हेलावणे
ॐकारात विलीनते......
साऱ्याचा अर्थ एकच
अशा वेळी ' तू ' हवीस......

.३२.

आमचाही एक जमाना होता – रंगत होती मैफल
जात होतो महाबळेश्वरला – ऐकत होतो सैगल
लाजत होतो...रुसत होतो...भांडलोही होतो
विसरत होतो, स्मरतेय – भेळकांडतही होतो...

ठेचकाळून पडलो तेव्हा – एकदाच उमगलो
मागे गेलेल्या रस्त्यावरच हृदय हरवले आहे
वळणावळणांचा झालाता चक्रव्यूह...बाहेरही पडलो
एक मात्र कळत नाही...आत कसे गेलो होतो ?

.३३.

स्वप्नफुलासारखी प्राजक्त शिंपडतानाच बिलगलीस...
ओथंबून न्हातानाच गायलास षड्ज गांधारातील जोगिया
रातराणी स्पर्शताच विर्घळून गेलीस चन्द्रकांतासारखी
ओठ टेकता-टेकताच अश्रूंनी पुसलेस गीत
हात गुंफतानाच पुसल्यास भाग्यरेषा
माप ओलांडतानाच लाथाडलेस सौभाग्य...
स्वप्नफुलातील गांधार विर्घळताना
निदान तू तरी जोगिया ऐकवलास,
हे शोभते तुला?......

.३३.

स्वप्नफुलासारखी प्राजक्त शिंपडतानाच बिलगलीस...
ओथंबून न्हातानाच गायलास षड्ज गांधारातील जोगिया
रातराणी स्पर्शताच विर्घळून गेलीस चन्द्रकांतासारखी
ओठ टेकता-टेकताच अश्रूंनी पुसलेस गीत
हात गुंफतानाच पुसल्यास भाग्यरेषा
माप ओलांडतानाच लाथाडलेस सौभाग्य...
स्वप्नफुलातील गांधार विर्घळताना
निदान तू तरी जोगिया ऐकवलास,
हे शोभते तुला ?......

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८१०६२ काव्य
२१२९ ११।१।८४

३४.

कोसळावा आता तरी
तुझा आषाढ सारखा
गंध उमलू कळ्यात;
यावा त्यानेही गारठा
मात्रे कशी डोळ्यामध्ये
स्वप्नपंखांची भरारी
स्पर्शाविना आसक्तीची
ऊब राहते अंतरी.

तुझी नजर तान्हेली
माझ्यावरी पडताच
फुले फुटती रक्ताची
बोलतील तुझ्याशीच
उगा अनोखा यायचा
तुझ्या दुःखाला आकार
अश्रूंचा; मी, पुसावाच;
आणि वेडा हा निर्धार...

.३५.

श्रावणातल्या पावसाच्या धारांनाच पुसायची असते तृप्तीची धुंदी
आणि वळवाच्या सरींना कोसळता उत्साह
कमळातील भ्रमरच जाणतो प्रेमाची सलोखी ऊब
आणि चकोर विरहातला आवेग
माती देखील सांगेल, निर्मितीचा धुंदवेडा गंध
आणि काव्य; सर्जनाचा आनंद
पण तू...
तू मृदगंधाला विचारलीस पददलितांची व्यथा
आणि कमळातील भ्रमराला पारतंत्र्याची वेदना
चकोराकडून ऐकलीस निर्मात्याची भाकड थट्टा !
आणि श्रावणातल्या सरींमध्ये न्याहाळलीस मालिन्याची छटा...
वळवाच्या सरींना अविचारी आत्महत्येचं बिरुद दिलंस
तरी......
तुला हे कळलं कसं नाही ?
की तूच मला कळली नाहीस !.........

.३६.

प्रकाश सारा फुंकुन गेला
    रात्र अंगणा व्यापुन उरली...
ऊर कधीचा दाटुन येऊन
    दुःख–सागरा भोवळ आली
सुखही व्याले दुःख उरीचे
    तिमीर उरता, आशा मेली...
गदगदले किति नभ हे सारे
    सरिता उरली गढूळलेली
कधीकधीचा चालत आहे
    भेदुन गेलो क्षितिजहि सारे
तरी कळेना कशास आता
    कुठे, कुठे ते ध्येय हरवले
कुठूनहि येता कुठूनही जाता
    कधी काहीही गमले नाही,
गमले आता अंतर्यामी
    या रात्रीला पहाट नाही ...

३७

मनाची आग विझवायला लागतो
धगधगता बिन्दुस्रोत
लाव्हारसाचा
त्याला शमवत नाही
अश्रूंचा लोट
आणि
घामाचा डोह
त्याला पुरत नाही
रक्ताचा घोट
आणि अमृतकुंभ
मन तेव्हा विसावू पाहते
क्षितिजाच्या खांद्यावर.

.३८.

तुझ्या ओतप्रोत स्तनांनी
माझ्या अपेक्षांचे आकाश तोललेले असते
तुझ्या उरोज-स्पर्शांनी
माझ्या उपेक्षेचे क्षितीज फाटलेले असते---
तुझी धगधगती ऊब - दोन मांड्यातील
माझ्या वासनेचे परिमार्जन साधू पाहते
आणि ओष्ठद्वयांनी धरून ठेवलेली आसक्ती
माझ्या विकाराला फुंकारत जाते...
तुझ्या उधळमोकळ्या बेबंद उत्साहात
माझ्या नागव्या मोराचा निर्जीव डोळा
नाचतांना, हृदयात गलबलते एकच—
तुझ्या उसाश्यांनी
भर धावत्या श्वासात दिसू लागते...
मानेखालच्या तीळाचे उन्मत्त नर्तन...

.३९.

तुझ्या आसवांना आण
नाही त्यांनी वाहायचे
जरी दूर जाता त्यांनी
नाही कधी झुरायाचे

त्यांनी डोळ्यांत साठून
स्मृती सदा जपायाच्या
कुणा वेड्याला देखून
नाही कधी लोटायाच्या

नाही इतरा पाहून
त्यांनी शांत व्हावयाचे
फक्त एकला मी येता
माझ्यामध्ये मिळायाचे......

.४०.

माझ्या पावलांखालून, अल्लडपणे धावणारी ही अवखळ वाट
दोहींकडच्या हिरव्या रानांशी सलगीने कुजबुजत
विहरत जाते, बेबंद पसरलेल्या मोकळ्या मैदानात...
आणि एक अस्फुटसे वळण घेऊन, दिसेनाशी होते
मावळतीचा डोळा चुकवून निळ्या जांभळ्या आकाशात

'निळसर' भोगात रमणाऱ्या उधळवाटेला 'गवसतो' भगवा रंग
त्यागाच्या ओलाव्यात विखरून जातात प्रीतीची 'निळी' पाने
'निळा' मोर–त्याचा निर्जीव डोळा फुलारतो तेव्हा,
त्या वाटेलाही 'भगवा' रंग आवडू लागतो......

माझ्या पावलांच्या लयबद्ध नर्तनात थबकणारी वाट
दोहींकडच्या हिरव्यांशी अबोला धरते......
खोल गर्तेत जाणाऱ्या माझ्या दर्दभऱ्या जीवनात
आणि एका रक्ताळल्या भोवऱ्यात अडकून स्पष्ट दिसते
उगवतीला सामोरी जाताना गुलाबी जळात विरघळते ..

.४१.

प्रत्येकाची गती ठराविक
प्रत्येकाचा तालही तोच
प्रत्येकाचा नाजुक नखरा
प्रत्येकाची गहिरी खोच
प्रत्येकाचा मार्ग निराळा
प्रत्येकाचे वळणही न्यारे
प्रत्येकाने प्रत्येकाच्या
प्रत्येकातुन जावे कारे ?
कुणी चालतो तिरकस तिरपा
कुणी दाखवी उलटे पाय
चालायाची गती निराळी
प्रत्येकाचा प्रश्नही काय ?

.४२.

ठरविले होते मनी
आज शेवटच्या क्षणीं
डोळ्यामध्ये जरासुद्धा
नाही आणायाचे पाणी...

कधीही न मिळणारे
तुझे माझे मार्ग दोन
दूर जावे घेऊनिया
ओंजळीत मधुक्षण

तरी येते पुनःपुन्हा...
असे आभाळ भरुनी
कसे थांबवून आसू
हासु आणावे लोचनी ?

४३.

ओळखिचे दिसते तरी
का परके वाटे
ओळखिच्या हिरवळीवर
का रुतती काटे

ओळखिची हाक तरी
स्वर वाटे परका
ओळखिचे शब्दही हे
का देती चरका...

ओळखिचे वर आभाळ
ओळखिच्या तारा
ओळखिचे क्षितिज तरी
का बनते कारा ?...

तोडू कशी ? ओळखिचे
हे गज, दरवाजे !
साहु कशी ? मन कंदे
हे नाही माझे !

.४४.

तुझ्या धाडसाचं खरं म्हणजे कौतुक केलं पाहिजे
मिट्ट काळोखाच्या रात्री
घट्ट–मिटल्या दारे–खिडक्या,
तूच उघडल्यास...
आतल्या अस्पृश्य अंधाराशी
बाहेरच्या सवर्ण काळोखाची गाठ
घालून दिलीस...
उबगलो होतो,
भिंतींच्या सापळ्याला
काळ्याकुट्ट बुबुळांच्या अनंत प्रवासाला...
उघड्या दारातून, प्रकाशवलयांकित
सुघड सावळी मूर्ती आत डोकावली
आशा पालवली–पापणी प्रसवली...
अधीऱ्या कंठातून एक अर्धसत्य निसटलं,
'ये ना! तुझीच वाट पाहत होतो...'

.४५.

दे-देताना आज अचानक घेऊन गेलीस
खळाळताना आज अचानक गोठुन बसलीस
घेऊन गेलीस, गोठुन बसलीस हेही पुरेना
अस्तित्वाची दादही साऱ्या देऊन गेलीस

हसणे-रडणे, सुखदुःखांची कुजबूज...ओली
दिनरातीची स्वप्न नवाळी वाळुन गेली...
वाटत होते एकदाच तू जवळी घ्यावे...
कौतुक सगळे ओघळताना फिरुन हसावे....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
(८०६२ ६।८।८
२९२९) १।१।८४

४६.

आलीस तेव्हाच कळले होते
परत कधी जाणार आहेस
मागेही वळून पाहणार नाहीस
हे कसे कळले नाही ?

उमगले होते क्षितिजाचे
नसते नाते आभाळाशी....
क्षितिजही माझे नव्हते;
...हे कसे कळले नाही ?

.४७.

पुसले होते त्यांनी मजला, की होता ना रे
अनुभव काव्यामागे, कधी देखिले स्वप्न धुक्याचे
कधी उषेचे पकडलेस रे हसरे दंव नि झुलते लाघव ?
कळले कधि ना तुझे वायदे, गहिरेपण तव- !
अस्तित्वाची दादही अमुच्या का न घेतली ?
का न स्पर्शली, जाणवली ती अमुची आठवण ?
बोलुही शकलो नव्हतो मी अन् , ओठही हलले मुग्ध होउनी...
कळते कधि का सूर्यफुलाचे फुलते यौवन ?
जाणवती का चंद्रकलेचे पूर्ण वेगळे शारदीय कण ?
तरारलेले पाते कधि का सहज सांगते, अपुले गुंजन ?
काय करू मी, त्यांना सगळे कसे दाखवू ?
काय धरेच्या पोटामधले बीज दाखवू ?...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७८८४८
संदर्भ शाखा
(स्थळ प्रत)

.४८.

क्षितिज जसे तोलावे, तसे हिंडणे उरते.
देहावरची त्वचा छिलून, आम्ही भटकत नसतो...
त्यागालाही सीमा असते प्रत्येकाच्या. पोटही असते ओरडत.
तत्त्वज्ञानाच्या झिलईतूनच गत्रसत निनादतात व्यवहाराची नाणी.
आम्हीही म्हणतो त्याग करायचा...
कुणासाठी ? का ? किती काळपर्यंत ?
प्रश्नांनाच प्रश्न प्रसवतात...
उरते ते रितेपण...छे
पराभूतता...छे
व्यवहारी शहाणपण...छे
वैफल्य...छे
रडवेला ध्येयवाद...छे
उरतो तो माणूस...

.४९.

डवरलेल्या स्वप्नांचा वृक्ष,
उषेच्या चाहुलीनं जेव्हा वठून जातो;
तेव्हाच खरं म्हणजे अस्तित्वाची सीमा असते विरघळलेली–
संध्या रजनीच्या सीमारेषेवर
रेंगाळणारी चिवचिव,
जेव्हा घरट्यात जाते,
तेव्हाच कोमेजून जाते हिर्मुसलेली वाट...
आठवणींच्या संगतीत सावरून बसलेले क्षण
सहवासाचे,–उडून जातात रंग त्यांचे
तेव्हाच खरं म्हणजे म्हणायचं असतं–' See you ! '

५०.

सगळ्यांनी सांगितलं होतं.
ऐकलं नाही.
दृष्टी हवी, दृष्टिकोन नको.
पाऊलं हवी, मार्ग नको.
फार पुढचं पाहू नये.
भविष्याचं स्वप्न रेखाटू नये.
कारण आपण मर्त्य आहोत.
सॉक्रेटिसही होता......

पण नचिकेत स्वस्थ बसू देत नाही.
पूर्णविरामातून अनेक प्रश्नचिन्हं निर्माण करतो.
सर्व म्हणतात, तुझे हे वीणे बंद झाले पाहिजे.
प्रश्नांना जन्म देण्यात अर्थ नाही;
नखं लावली पाहिजेत...
अनेक गर्भपात केले; तरी उरली ना आसक्ती
अनेक सोडचिठ्ठया दिल्या; तरी आली नाही विरक्ती
नचिकेत जिवंत आहे ना!

मेल्यानंतरही भूताला प्रश्न विचारेल...
येणारे यमदूत घाबरतात त्याला...
( म्हणून तो लवकर मरत नाही म्हणे...)

•

अनेक त्यागातही त्याला का जाणवतात स्वार्थ आणि;
अनेक इमारतींच्या खाली गाडलेले आत्मे...
देवळाच्या कळसाची मजा पाहता पाहताच तो
अस्वस्थ का होतो ?
अनेकांच्या मंगलजत्रेत, सनईऐवजी; अश्रू
रक्तसुरात का रंगवतो....
मोठेपणाला यातनांची सोबत असावीच का ?
आणि अनेकांना आश्रय देणारा वटवृक्षही;
आत ढासळला असतो का ?
का हे प्रश्न त्याला ग्रासतात...
आणि खरंच-खरंखुरं वाटतं-
माझ्यातला नचिकेत मेलाच पाहिजे !

.५१.

माझ्यातल्या साऱ्या उणिवांना सोबत घेऊन,
आकाश कोसळलं होतं तुझ्या दारी;
तेव्हा, तुझ्या साऱ्या पुण्याईचं बळ पाठीवर घेऊन म्हणालास,
“ इतका तोल गेलेला बरा नाही;
पडलास, तर मला पाहवणार नाही.
या आकाशाइतका मोठा हो. ”
मी आकाश होण्याचा प्रयत्न करतोय...
पण तू कुठे आहेस ?
तुझ्या नसण्याने माझ्या आकाशाला मात्र तडा जातो आहे.

.५२.

तुझ्या पावलांची मंदमंद चाहूल
आणि निःश्वासांची ऊबदार हालचाल
तुझ्या नयनांची सलज्ज कुजबूज
आणि ओष्ठद्वयांचे निःशब्द विभ्रम
तुझ्या अबोल्यानं जितकं सांगितलं
तितकं तुझ्या चुंबनात
तुझ्या मिठीत
तुझ्या उरोजात
देखील
घावलं नाही......!

.५३.

ज्ञानेशाची ओवी व्याली
गगनाचा ज्ञेयपणा
आकाशाला फळे आली
ज्ञानयाचा मोठेपणा.

ज्ञानेशाची ओवी एक
पितापिता अंतरलो
अंतरात माझ्या मी
मनमुक्त बागडलो

ज्ञानेशाची ओवी एक
निवृत्तीची मुक्ता होते
सोपानाचा मार्ग मात्र
ओढ ज्ञानयाची होते.

ज्ञानयाचा, अमृताचा
आला...आला अनुभव
ज्ञानयाच्या अनुभवा
अमृताने दिली ठेव.

.५४.

युगामागे गेली युगे
वेल वठे चांदण्याची
        किती सूर्य मालवले
        गणती ना गोलकांची
एकदाच जाहलेली
भेट आहे, जप त्याची
        कुपीमध्ये साठवली
        गंधखूण बकुळीची
युगांचा हा लपंडाव
वेडी धावतसे आशा...
        नाद सुटेना, सुटेना
        अडे रेशमाच्या पाशा
किती व्रत जपायाचे
पुरे लपंडाव आता...
        तुझ्यामाझ्या व्रताची रे
        होवो ‘ अद्वैती ’ सांगता......

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ८१०६२ दि: ५/१०
क्रमांक २१२८ नोंद दि: १/१०

.५५.

आयुष्याचीच संवेदना जेव्हा बधीर होते
आणि वेदनेतून आनंदाचे पाझर बरसू लागतात...
स्वप्निल पापण्यांच्याच बंधनात अडकते भविष्याचे इन्द्रधनुष्य
आणि काळजीच प्रसवते संकटांचे पहाड
संकटांच्या पहाडातून वर्तमानाची लेणी डोकावतात
आणि स्वप्निल पापण्यातून भूतकाळाची आसवे

आनंदाचीच संवेदना जेव्हा बधीर होते ना...
आयुष्य तेव्हाच दाद मागत असतं—
परत कधी जर येणार असशील,
तर एकच ठरवायचे
एकच बोलायचे...

पूर्वी जसे दूर गेलो तसेच दूर जायचे...
कारण,
तीच वाट मळलेली असते...

.५६.

जगणे किती स्वस्त होत चालले आहे...
मरणाची महागाई...
रेशनच्या रांगेतले...
लोकलच्या गर्दीतले
थिएटरच्या मॉबॉतले...
आणि अनेकांच्या नजरतेले मरण—
मरणाच्या अगोदर साले आम्हीही कितीकदा मेलो.
आमचे खांदे देखील दुखले...

मनातल्या स्वप्नाच्या तिरडीचे ओझे किती
' जीवघेणे '...
आम्हाला ऊब देखील मिळाली.
आमच्या त्वचेतल्या पेशीसुद्धा मोहरल्या चितेत...
खरं तर लाकडं रचायलाच नको होती.
आणि मडक्यांची, पिंडाची पिलावळही नको होती.

पण मरण काय सांगून येतं ?
ते अनाहूत, अकस्मात अवतरतं
जन्मासारखं...
आमच्या बापानं काय परवानगी
विचारली होती ?
म्हणून तो आकाशातला बाप विचारेल ?

मरण्याचा खर्च बेफाम असतो—
एरव्ही सव्वा रुपयात ' खन्नाकट ' मारणारा
' हेअर कटिंगवाला ' तेव्हा भादरायला सुद्धा
चार रुपये घेतो—
आणि चितेतच सिगरेट पेटवून घेत
मंत्रणारा तो बामण तर,
पंचवीस रुपयांशिवाय बोलत नाही.
सारी फुलं महाग...सारे पिंड महाग
वाटतं...वाटतं...
जगणे देखील स्वस्त आहे मरण्यापेक्षा !

.५७.

गोष्ट जर आटपाट नगराचीच होती
तर स्वप्नात तरी राजधानी कशाला चितारलीस ?
    साता समुद्रांपलिकडचे ते सारे महाल अफवाच होती
    तर त्यांच्या वाटेचे वर्णन किती वेळ करायचे ?
जर राणीच्या स्वप्नामधील दिव्यातून अल्लाउद्दिन प्रकट व्हायचा
तर अलिबाबाच्या चाळीसांची संख्या का मोजलीस ?
    आणि हे सारं अंगाईगीत होतं......
    तर हुंकाराची शपथ तरी कशाला घातली होतीस ?
साठा उत्तराची ही कहाणी होती;
तर पाचा उत्तरी का संपवलीस ?......

.५८.

गच्च झाडं.
पानांनी डंवरलेली.
दिसतो फक्त आता,
त्यांच्यातून ठिबकणारा उन्हाचा तिरपा छेद....
दुपारची सावली;
पायच असतात तिला,
मृद्‌गंधाचा मागोवा घेत जात असते,
चाटत असते...
भागवते आपली खारट तहान.

पापण्यांनी ताणून धरलेले तुझ्या परतीचे रस्ते;
बुबुळात साचलेली काळजी;
—रस्ते लहान असतात;
मोठेही—
त्यांना अंत नसतोच का ?
चालायचं किती ?
प्रश्नाची चिन्हं कायम असतातच.

चाळ थकले, तरी नाद-ताल चुकत नाहीत
फूल सुकले, तरी गंध मरत नाही
शरीर कातावले, तरी स्पर्श बुजत नाही.

साचलेल्या डोळ्यांनीही कवेत धरता येतो भविष्यकाळ,
पण तू येत नाहीस...
मी सापडले आहे चक्री वादळाच्या टोकावर
अन् खोल सागराच्या वडवानलात
असंख्य वास देणाऱ्या रात्री...
शरीर तृप्त,
मन ?
तेव्हा जाणवते,
वाटते
अथांग सागराकडे पहात,
न्याहळत उभे राहत
व्हावे कन्याकुमारी !

राजा ग्रंथ संग्रहालय, आप. ...
८१०६२ ... ६।०८
२१२९ ... ११

.५९.

सारे सहन करिता
बधीरली काया सारी
सारे सोसता सोसता
बोथटली मने न्यारी

सारे सोसून उरता
आज मात्र येते ध्यानी
प्यालो अश्रु, वेदना मी
काही उरले ना मनी

काही जवळ नाहीची
मनी मात्र होती आस
अज्ञेयाच्या क्षितिजाचा
प्यालो होतो आम्ही ध्यास...

६०.

अशीच होडी वल्हवीत...वल्हवीत न्यावी...
दिशा नसली तरी...कुठली तरी दिशा आपली होईल.
लाटांच्या लयबद्ध नर्तनात, दीपस्तंभच बुजला तर;
धैर्य द्यावे, आपणच आपल्याला—केव्हातरी येईल किनारा...
फारच झाले वादळ आणि फुटलीच होडी तर म्हणावे,
" आता दोन्ही दिशा तुझ्याच आहेत
खुशाल माळ तू मृत्युफुले ! "......

अस्तित्वसीमेला बिलगून आंदणासारख्या येणाऱ्या मृत्यूचं दिलखुलास स्वागत करणारी ही कै. विलास शामराव कुलकर्णी यांची ' आंदण-रेषा ' आधुनिक मराठी कवितेत वैशिष्ट्यपूर्ण ठरावी.

ऐन पंचविशीतच मृत्यूच्या अनामिक पण उत्कट हुरहुरीनं या कवीला घेरलं होतं....त्यांच्या आकस्मिक झालेल्या निधनाचा बराचसा अन्वयार्थ मला स्वतःला त्यांच्या कवितेतूनच उलगडत गेला...मानवी जीवनातील व्यंजनेतून निसटणाऱ्या या मृत्यूच्या ' अक्षर-मुद्रा ' त्यांच्या कवितेत क्षणोक्षणी आपलं रूप बदलत राहतात. या अक्षरमुद्रेनं अंकित झालेलं हे अस्तित्व क्षणभर बावरतंही, पण आयुष्याची तीव्र आणि सखोल समज धैर्य देत राहते.

" मरण हे अकस्मात, अनाहूत अवतरतं जन्मासारखं, " असं म्हणतानाच, जन्मापासूनच सोबत करणाऱ्या या सख्याशी आणि त्याच-बरोबर दुनियेशीही ( तिचीही सोबत जन्मापासूनच ! ) ही कविता " स्वतःच्या अस्तित्वाचा बुंधा हलवून " झोंबी खेळू पाहते. या अपूर्व झोंबीतून मिळालेल्या अंतस्फूर्त आत्मप्रत्ययाने रसिकाला अंतर्मुख करण्याचं सामर्थ्य या ' आंदण-रेषेतून ' जाणवत राहतं.

ही ' आंदण-रेषा ' प्रीतीचा गहिरा आणि आसक्त साज लेऊनही येते, पण ' आंदण-रेषेचं ' भान मात्र कधीच विसरत नाही.

यामुळंच अस्तित्वाचा छेद घेणाऱ्या या ' आंदण-रेषे 'पुढे ' उन्हं-पावसात न्हाणारं सौभाग्य-कुंकूही अपरिहार्यपणे शरण जातं....माने-खालच्या तीळाचं उन्मत्त नर्तन पाहताना धुंद होणारी नजरही, स्वप्न-फुलातून विर्घळणाऱ्या षड्ज गांधारातील जोगियाच्या आर्त स्वरांनी अंतर्यामी व्याकुळशी होते. नचिकेताचा अश्रू मंगल-जत्रेतही रक्तसुरात आळवला जाऊ लागतो आणि ' निळ्या ' उधळवाटेला गवसणाऱ्या

'भगव्याला' सुद्धा आपल्या पायाखालची वाट रक्ताळलेल्या भोवऱ्यात अडकलेली दिसते–स्पष्टपणे! तुझ्या–माझ्या प्रीतीची 'सांगता' अद्वैती होत असतानाच साठा उत्तरांची ही कहाणी पाचा उत्तरातच संपुष्टात येते. सगळी गोष्टच मुळी शेवटी अशी 'आटपाट–नगराचीच' ठरते!

सात–पावलं बरोबर चालूनही अखेर पावला–पावलांची घालमेल; कितीही उलघाल झाली तरी होणारच असते. या जीवन–मार्गाची ऐल-तीराची एक क्षितिज–रेषा मसणवटीतून भेदणाऱ्या मरण–वाटेला कधीचीच जाऊन मिळालेली असते. या रस्त्याला अंत नाही, या रात्रीला आता पहाट नाही, हे तिलाही उमजतं....आणि येथे मात्र 'फार पुढचं पाहायला मन धजत नाही, ही जाणीव विद्ध करते. या रस्त्यावरून चालताना कुठे कुठे 'मागल्या मुक्कामाची'...'ध्येय हरपल्याची'...यादही त्याच वेळी मनात सलते आहे. प्रीती...अस्तित्व...आंदण रेषा–या 'त्रिशंकू'त हेलकावे घेणारी ही कविता मरणरंगातूनही अस्तित्वाची न्यारी लज्जत चाखत राहते आणि वेळ येताच म्हणून जाते 'आता दोन्ही दिशा तुझ्याच आहेत! खुशाल माळ तू मृत्यूफुले!"

**सुमेधा विलास कुलकर्णी**

## कै. प्रा. विलास शामराव कुलकर्णी

**जन्म** : ९ जानेवारी १९४७, पुणे.

**शिक्षण** : शालेय शिक्षण सरस्वती-मंदिर, पुणे. पुणे विद्यापीठाची बी. ए. परीक्षा उच्च द्वितीय श्रेणीत स. प. महाविद्यालयातून उत्तीर्ण. मराठी, संस्कृत व मानसशास्त्र हे बी. ए. चे विषय.

पुणे विद्यापीठाची एम्. ए. परीक्षा एन्टायर मराठी हा विषय घेऊन १९७० मध्ये उच्च द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.

**अध्यापन** : आरंभी अलिबाग येथील जे. एस. एम्. कॉलेज व नंतर पुणे येथे बृहन् महाराष्ट्र कॉमर्स कोलेज मध्ये 'मराठी' या विषयाचे अध्यापन.

**विवाह** : २१ डिसेंबर १९७०.

**मृत्यू** : १६ डिसेंबर १९७२.

# कवितांच्या पहिल्या ओळींची सूची


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| अर्थहीन शब्दांची याचना | ३१ |
| अनेक उन्हं साकळत | २८ |
| अशीच होडी वल्हवीत | ६६ |
| अस्मानफेक जातीच्या | १५ |
| आमचाही एक जमाना होता | ३५ |
| आयुष्याचीच संवेदना जेव्हा | ५९ |
| आलीस तेव्हाच | ४९ |
| उजाड झाले तरीही | ३० |
| उलगडता बावरले | २७ |
| ओळखिचे दिसते तरी | ४६ |
| कुणी मला विचारिता | २८ |
| कोसळलो असतो तरिही | ३२ |
| कोसळावा आता तरी | ३७ |
| खूप योजलं होतं | २० |
| गच्च झाडं पानांनी डंवरलेली | ६३ |
| गोष्ट जर आटपाट नगराचीच | ६२ |
| जगणे किती स्वस्त | ६० |
| जळणे ज्ञात असते | १६ |
| ज्वालांची फुले माळून | ३४ |
| झपाटल्यागत आपण | १३ |
| ठरविले होते मनी | ४५ |
| डवरलेल्या स्वप्नांचा वृक्ष | ५२ |
| तुझ्या आसवांना आण | ४२ |
| तुझ्या ओतप्रोत स्तनांनी | ४१ |

| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| तुझ्या दोन हातात | २९ |
| तुझ्या धाडसाचं | ४७ |
| तुझ्या पावलांची मंद मंद चाहूल | ५६ |
| तुझ्या मत्त उरोजांशी | २६ |
| तुझ्या सावल्यांना होता | २५ |
| तोंडावर बुरखे घेऊन वावरणे | २९ |
| दे-देताना आज अचानक | ४८ |
| देठानेच घेतला होता | २७ |
| नको आता बोलावूस | ३२ |
| नवे रंग, नवे अंग | २२ |
| पुसले होते त्यांनी मजला | ५० |
| प्रकाश सारा फुंकुन गेला | ३९ |
| प्रत्येकाची गती ठराविक | ४४ |
| मनाची आग विझवायला लागतो | ४० |
| मरणवाट, मसणवटीतून भेदणारी | ११ |
| माझ्यातल्या साऱ्या उणिवांना | ५५ |
| माझ्या पावलांखालून | ४३ |
| माझ्या प्रत्येक क्षणाच्या | १४ |
| मी तुला आताच | २३ |
| युगामागे युगे गेली | ५८ |
| विसरायाचे असेल काही | ३२ |
| सगळ्यांनी सांगितलं होतं | ५३ |
| समुद्र डहुळला तेव्हाची आग— | १७ |
| सरतेशेवटी तुझी वाट | ३० |
| सर्व देऊन टाकण्याचेच आंदण | १२ |
| सहा एक्कावन्‌ची बस चुकली— | ३३ |
| सागराला छेदणारी क्षितिजरेषा | ३१ |
| सात पावलांत | १८ |

पृष्ठ क्रमांक

सारे सहन करिता ६५
सौंदर्यानं निथळणाऱ्या २१
स्वप्नफुलासारखी ३६
श्रावणातल्या पावसाच्या धारांना ३८
क्षणामध्येच पूर्वरचित आयुष्याचा २५
क्षितिज जसे तोलावे ५१
क्षितिज हिंदकळेतो २६
ज्ञानेशाची ओवी...... ५७

REFBK-0018848



विलास [illegible]